# वॅनबरी लिमिटेडची एकूण विक्री रू.३८८.५ कोटी करोत्तर नफा रू.२९.८ कोटी

पुणे : वेगाने प्रगती साधणाच्या वॅनबरी लिमिटेड कंपनीने ३० सप्टें ०८ रोजी समाप्त १८ महिन्यांच्या कालाबधित रू.३८८.५ कोटी विक्री साध्य केली असून त्यावर रू २९.८ कोटी करोत्तर नफा कमावला आहे. त्यामुळे गेल्या १८ महिन्यात कंपनीची प्रतिसमभाग मिळकत (इपीएस) रू.२०.५ झाली आहे.

उतरलेल्या दराने माल विक्री झाल्यामुळे कंपनीच्या प्रचालन पातळीवरील मार्जिनमध्ये ३.९१ टक्के वाढ होऊ शकली आहे. तसेच एफसीसीबी मुळे होणारे विदेशीचलन नुकसान भरून काढव्यासाठी कंपनीने तरतूद केली आहे. त्यामुळे मार्जिनमध्ये ३ टक्के घट झाली आहे. तसेच इतर उत्पन्नात घट झाल्यामुळे निव्वळ मार्जिनच्या प्रमाणात सुध्दा थोडी घट झाली आहे. त्याचप्रमाणे व्याज घसारा वाढल्यामुळे देखील निव्वळ गार्जिनमध्ये घट झाली आहे. वित्तीय वर्ष ०७ मध्ये प्रलंबित कर मालमत्तेमुळे (डेफर्ड टॅक्सअसेट) करोत्तर नफ्यात म्हणजेच मार्जिनमध्ये ४ टक्के वाढ झाली होती.

लेखापरिक्षणाचा काळावधी सहा महिन्यांनी वाढवत्यामुळे ०८ सालातील वित्तीय निश्कर्वाची ०७ सालातील वित्तीय निष्कर्षाबरोबर तुलना करण्यात आलेली नाही.